**भारती विद्यापीठाचे**

**मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव.**

**अर्थशास्त्र विभाग**

**व**

**भारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान केंद्र सांगली**

**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**डिजिटल साक्षरता**अभियान




भारती विद्यापीठाचे

मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव.

## अर्थशास्त्र विभाग वभारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान केंद्र सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने


## डिजिटल साक्षरता अभियान अहवाल २०२२-२०२३

भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,कडेगाव. अर्थशास्त्र विभाग वभारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान केंद्र सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटलसाक्षरता कार्यक्रमांतर्गत कडेगांव तालुक्यातीलअंबक येथे अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. संजय ठिगळे यांचे 'डिजिटल साक्षरता' या विषयावर शनिवार दि. १९ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी १० वाजता अंबक ग्रामपंचायतीच्या सभागृहात व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. वाय. कदम होते. प्रारंभी उपस्थित्तांचे स्वागत प्रा. अशोक माळी यांनी केले.

मार्गदर्शनपर भाषणात प्रा. संजय ठिगळे म्हणाले की,ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी डिजिटल साक्षरता अभियान राबविणे आवशक्य आहे. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. वाय. कदम म्हणाले की,ग्रामीण विकासाच्या दृष्टीने भारती विद्यापीठाने शिक्षणाची द्वारे खुली केली असून त्याचाच भाग म्हणून कन्या महाविद्यालयाने गावोगावी जाऊन घरोघरी डिजिटल साक्षरतेचे महत्व समजावून सांगण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. कार्यक्रमास उपसरपंच रोहित जगदाळे,, सुनील जगदाळे,राहुल पाटील,राजाराम जगदाळे,पांडुरंग जगदाळे,विवेक जगदाळे त्याचबरोबर गावातील विविध संस्थाचे अधिकारी,पदाधिकारी,ग्रामस्थ त्याचबरोबर अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार उपसरपंच रोहित जगदाळे यांनी मानले.

कार्यक्रमानंतर अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थीनींनी अंबक गावातील विविधदुकानांमध्ये, रेशन दुकानामध्ये भेटी दिल्या. आबालवृद्ध, तरुणाई त्याचबरोबर अनेक गृहिणीशी सुसंवाद साधला. एवढेच नव्हे तर त्यांना डिजिटल व्यवहार कसे करावेत या विषयी माहिती सांगून प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. आर्थिक फसवणूक होऊ नये म्हणून कोणत्या दक्षता घ्याव्यात या संबंधीचे प्रबोधन करण्यात आले. सदरच्या उपक्रमात अर्थशास्त्र विभागाच्या २५ विद्यार्थीनी दोन प्राध्यापक आणि १२५ ग्रामस्थ सहभागी झाले.




# डिजिटल साक्षरता अभियान






**'डिजिटल साक्षरता' विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.संजय ठिगळे आणि ग्रामस्थाचा सहभाग**






**अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य डॉ.व्ही.वाय.कदम आणि ग्रामस्थांच्या समवेत सहभाग**





**अंबक (कडेगाव,जि. सांगली) येथील ग्रामस्थांना डिजिटल साक्षरतेचे धडे देत असताना विद्यार्थीनी**






**अंबक (कडेगाव,जि. सांगली) ग्रामस्थांना डिजिटल साक्षरतेचे धडे देत असताना विद्यार्थीनी**

# कन्या महाविद्यालयात डिजिटल साक्षरता अभियान

**वांगी / वार्ताहर**

कडेगांव येथील भारती विद्यापीठाच्या मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयाचा अर्थशास्त्र विभाग व भारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान केंद्र, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने कडेगांव तालुक्यातील अंबकमध्ये डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात आले. प्रा. संजय ठिगळे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. वाय. कदम होते.

प्रा. अशोक माळी यांनी डिजिटल साक्षरता अभियानाचा उद्देश विषद केला. प्रा. संजय ठिगळे म्हणाले, ग्रामीण भागाच्या



**अंबकः डिजिटल साक्षरता अभियानमध्ये सहभागी कन्या महाविद्यालयातील विद्यार्थिनी.**

शाश्वत विकासासाठी डिजिटल साक्षरता अभियान राबविणे आवश्यक आहे. विशेषतः खेड्यातील लोकांची आर्थिक फसवणूक होऊ नये, याची खबरदारी म्हणून डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. डिजिटल साक्षरता हा भारताला महासत्तेकडे घेऊन जाण्याचा एक मार्ग असून तो अंगिकारला नाही तर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. त्यामुळे युवक, युवती, स्वयंसेवी संस्था व ग्रामस्थ यांनी डिजिटल साक्षरता अभियानात सक्रिय सहभागी होणे गरजेचे आहे.

प्राचार्य डॉ. व्ही. वाय. कदम यांनी मार्गदर्शन करताना गावोगावी डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. जेणेकरून ग्रामीण भागात आर्थिक साक्षरता निर्माण होईल, अशी भूमिका मांडली. याप्रसंगी अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी ग्रामस्थांना घरोघरी जाऊन डिजिटल व्यवहाराचे महत्व समजावून सांगितले. त्याबरोबरच डिजिटल व्यवहाराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. आभार उपसरपंच रोहित जगदाळे यांनी मानले. सुनील जगदाळे, राहुल पाटील, राजाराम जगदाळे, पांडुरंग जगदाळे, विवेक यादव, आत्माराम जगदाळे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

Scanned with CamScanner

# अंबकमध्ये डिजिटल साक्षरता अभियान

**केसरी वृत्तसेवा**

**कडेगांव** : भारती विद्यापीठाच्या मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयाचा अर्थशास्त्र विभाग व भारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान केंद्र, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने कडेगांव तालुक्यातील अंबक गावामध्ये डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात आले. अंबक ग्रामपंचायतीच्या सभागृहात अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. संजय ठिगळे यांचे डिजिटल साक्षरता या विषयावर व्याख्यान संपन्न झाले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. वाय. कदम होते. याप्रसंगी प्रा. अशोक माळी यांनी डिजिटल साक्षरता अभियानाचा उद्देश विषद केला. मार्गदर्शनपर भाषणात प्रा. संजय ठिगळे म्हणाले, ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी डिजिटल साक्षरता अभियान राबविणे आवश्यक आहे. अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. वाय. कदम म्हणाले, ग्रामीण विकासाच्या दृष्टीने




**डिजिटल साक्षरता अभियान प्रसंगी अंबक गावातील पदाधिकारी, ग्रामस्थ, प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थिनी.**

त्याचाच भाग म्हणून कन्या महाविद्यालयाच्यावतीने गावोगांवी डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. याप्रसंगी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या विद्यार्थिनींनी ग्रामस्थांना घरोघरी जाऊन डिजिटल व्यवहाराचे महत्व समजावून सांगितले. त्याबरोबरच डिजिटल व्यवहाराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. आभार उपसरपंच रोहित जगदाळे यांनी मानले. कार्यक्रमास सुनिल जगदाळे, राहुल पाटील, राजाराम जगदाळे, पांडुरंग जगदाळे, विवेक यादव, आत्माराम जगदाळे उपस्थित होते.

Scanned with CamScanner